**अकोला विमानतळाच्या धावपट्टीचा विस्तार १८०० मीटर करण्यासाठी २२.२४ हे. आर जमीन संपादीत करण्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्र. मविवि-१२१७/प्र.क्र.१११/विमान-२**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई ३२.
दि. ०२ जून, २०२६.

वाचा : १. सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र. मविवि-१२२५/प्र.क्र.२९/विमान-२, दि.१० डिसेंबर, २०२५
२. सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र. मविवि-१२१७/प्र.क्र.१११/विमान-२, दि.१७ नोव्हेंबर, २०२५
३. मुख्य नियोजनकार-प्रभारी, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी, मुंबई यांचे पत्र क्र.मविविकं/भूसं/२०२६/३०४६, दि.११.०३.२०२६ व क्र.मविविकं/भूसं/२०२६/३१०३, दि.१८.०३.२०२६.
४. शक्ती प्रदत्त समितीचे दि.२० मे, २०२६ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

**प्रस्तावना :**

अकोला विमानतळाच्या धावपट्टीचा विस्तार करण्यासाठी अतिरिक्त २२.२४ हे. आर क्षेत्र संपादित करण्यासाठी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीस भूसंपादन संस्था तसेच सदरचे भूसंपादन करण्यासाठी जिल्हाधिकारी अकोला यांना भूसंपादन अधिकारी म्हणून संदर्भ क्र.१ शासन निर्णयान्वये प्राधिकृत करण्यात आले आहे. अकोला विमानतळाच्या विस्तारासाठी २२.२४ हे.आर क्षेत्र थेट खरेदी पध्दतीने संपादित करण्यासाठी रू.२०८.७६ कोटी इतक्या खर्चास संदर्भ क्र. २ येथील शासन निर्णयान्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली आहे.

अकोला विमानतळाच्या धावपट्टीचा १४०० मीटर वरून १८०० मीटर विस्तार करण्याकरीता आवश्यक असलेल्या २२.२४ हे.आर क्षेत्रामध्ये, संयुक्त मोजणी अहवालानुसार एकूण ४८६ भूधारक असून ते सर्व "शिवर" या महसूली गावातील आहेत. शिवर गाव व भूसंपादनाधीन क्षेत्र सद्यस्थितीमध्ये महानगरपालीका, अकोला यांच्या हद्दीत समाविष्ट झाले आहे. भूसंपादनाधीन क्षेत्रामध्ये एकूण ४८६ भूधारकापैकी अंदाजे ४७२ भूधारक अकृषक भूखंड धारक आहे. त्यांचे थेट खरेदीपध्दतीने भूसंपादन करण्याकरिता सर्व भूधारकांचे संमतीपत्र प्राप्त करून घेऊन भूसंपादक यंत्रणेला थेट खरेदीने भूसंपादन करण्याचा प्रस्ताव सादर करणे, प्रत्येक प्लॉट धारक यांचा शोध अहवाल काढणे, त्याकरिता सदर महसुली गावाचे मागील ३० वर्षाचे महसूली दस्तऐवज शोधणे, तसेच भूसंपादन खरेदीकरीता प्रत्येक भूधारक हा स्वत: खरेदी करण्याकरिता उपस्थित राहणे अनिवार्य असून

ज्या ठिकाणी सामाईक क्षेत्र आहे त्याठिकाणी सर्व भूधारक थेट खरेदी करीता उपस्थित राहणे आवश्यक आहे. त्यापैकी एक जरी भूधारक अनुपस्थित राहीला तरी नियोजित खरेदी प्रक्रिया पूर्ण होऊ शकणार नाही. थेट खरेदीने भूसंपादन करणे ही प्रक्रिया विमानतळ विस्तारीकरणाकरिता वेळखाऊ होऊ शकते, तसेच काही प्लॉट धारक हे स्थानिक रहिवासी नसल्यामुळे त्यांचेशी मुदतीत संपर्क होऊन सदर प्रक्रिया राबविणे ही बाब सुध्दा अतिशय क्लिष्ट असल्यामुळे थेट खरेदीने भूसंपादन करताना अडचण निर्माण होईल व काही भूधारकांनी जर खरेदी करण्यास नकार दर्शविला तर भूसंपादन कायद्यानुसार भूसंपादन करावे लागेल त्यामध्ये परत वेळ लागेल, या विविध कारणांमुळे विहीत मुदतीत भूसंपादन प्रक्रिया राबविता येणे शक्य होणार नसल्यामुळे सदरचे क्षेत्र थेट खरेदी पध्दतीने संपादीत करण्याऐवजी भूसंपादन कायदा, २०१३ नुसार संपादीत करण्यासाठी रू.१८९,५३,४८,३५४/- इतक्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणेबाबत महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने शासनास प्रस्ताव सादर केला होता. सदर प्रस्ताव मा.मुख्य सचिव महोदयांच्या अध्यक्षतेखालील शक्ती प्रदत्त समितीच्या दि.२० मे, २०२६ रोजीच्या बैठकीत सादर करण्यात आला होता. त्यास शक्ती प्रदत्त समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली असून त्यानुसार खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय :**

अकोला विमानतळाच्या धावपट्टीचा १८०० मीटर विस्तार करण्यासाठी अतिरिक्त २२.२४ हे. आर क्षेत्र थेट खरेदी पध्दतीने संपादित करण्यास संदर्भ क्र. २ शासन निर्णयान्वये दिलेली मान्यता रद्द करण्यात येत आहे.

२. अकोला विमानतळाच्या धावपट्टीचा विस्तार १४०० मी. वरून १८०० मी. करण्याकरीता मौजे शिवार येथील २२.२४ हे. आर. क्षेत्र भूसंपादन कायदा, २०१३ नुसार संपादित करण्यासाठी रू.१८९,५३,४८,३५४/-इतक्या खर्चास खालीलप्रमाणे प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | तपशील | २०१३च्या कायद्यानुसार (रु.मध्ये) |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| ०१ | २२२४०४ चौ.मी. (२२.२४हे.आर.) संपादित जमीनीचे मुल्य | ४०,९४,९३,०५०/- |
| ०२ | गुणक १ प्रमाणे मुल्य | ४०,९४,९३,०५०/- |
| ०३ | बांधकामाचे अंदाजीत मुल्य | २५,००,००,०००/- |
| ०४ | फळझाडांचे अंदाजीत मुल्य | ३,००,००,०००/- |
| ०५ | इतर झाडांचे अंदाजीत मुल्य | १,००,००,०००/- |
| ०६ | संपादनामधील अनुषंगीक बाबी अंदाजीत मुल्य | १,००,००,०००/- |
| ०७ | **एकूण अंदाजीत मुल्य (अ.क्र.०२ ते ०६)** | **७०,९४,९३,०५०/-** |

| | | |
|---|---|---|
| ०८ | अ.क्र.०७ च्या रक्कमेवर येणारी सोलॅशियम रक्कम (१०० टक्के) | ७०,९४,९३,०५०/- |
| ०९ | **अ.क्र.०७ + ०८ नुसार येणारी एकूण रक्कम** | **१,४१,८९,८६,१००/-** |
| १० | अ.क्र.०९ च्या रक्कमेवर येणारे १२% प्रमाणे व्याजाची अंदाजीत रक्कम | १४,७४,१७,४९८/- |
| ११ | **अ.क्र.०९+१० नुसार येणारी एकूण रक्कम** | **१,५६,६४,०३,५९८/-** |
| १२ | प्रकल्प खर्चात वाढ होण्याच्या शक्यतेच्या अनुषंगाने अ.क्र.११ नुसार येणाऱ्या एकूण रक्कमेवर वाढीव रक्कम (१० टक्के) | १५,६६,४०,३६०/- |
| १३ | **अ.क्र.११ व १२ नुसार येणारी एकूण रक्कम** | **१,७२,३०,४३,९५८/-** |
| १४ | अ.क्र.१३ नुसार येणाऱ्या एकूण रक्कमेवर उपविभागीय अधिकारी - आस्थापना खर्च (६ टक्के) | १०,३३,८२,६३७.५/- |
| १५ | अ.क्र. १३ नुसार येणाऱ्या एकूण रक्कमेवर म.वि.वि.कंपनीचा आस्थापना खर्च (४ टक्के) | ६,८९,२१,७५८.३१/- |
| १६ | **अ.क्र.१३, १४ व १५ नुसार येणारी एकूण रक्कम** | **१८९,५३,४८,३५४/-** |

३. या बाबतचा होणारा खर्च "मागणी क्रमांक ए-७, ३०५३ नागरी विमानचालन, ०२ विमानतळ, १९० सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणूका, (००) (०२) विमानतळाच्या विकासाकरिता महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीस सहायक अनुदान (कार्यक्रम) (३०५३ ०१६४) या लेखाशिर्षातील ३१ सहायक अनुदाने (वेतनेत्तर) या उद्दिष्टाखाली संबंधित आर्थिक वर्षात उपलब्ध तरतूदीतून भागविण्यात यावा, व त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा. याबाबत उपसंचालक, विमानचालन संचालनालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी तसेच संचालक विमानचालन संचालनालय, मुंबई यांना नियंत्रक अधिकारी प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्र. २०२६०६०२१११६२७०३०७ असा आहे. हे आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

VARSHA SANDEEP TANDEL

Digitally signed by VARSHA SANDEEP TANDEL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GAD, 2.5.4.20=88DDA02271A3AA8E76A7AECF8D6EFC85CB3482A471B1F362CC2A2DF648E88405, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=4AD1C69F882FC4BFCFD7FE76EF3A536040E61D009CA9A87AF4CBDB0B0A3E8EF1, cn=VARSHA SANDEEP TANDEL
Date: 2026.06.02 11:17:26 +05'30'

**(वर्षा तांडेल)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत ,**

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास व इतर) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क व इतर) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य याचे स्वीय सहायक,
५. अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय,मुंबई.

६. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय,मुंबई.
७. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय,मुंबई.
८. अपर मुख्य सचिव, मा.मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय,मुंबई.
९. अपर मुख्य सचिव (विमानचालन), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,मुंबई.
१०. अपर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय,मुंबई.
११. अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई.
१२. अपर मुख्य सचिव, (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय,मुंबई.
१३. अपर मुख्य सचिव, (ऊर्जा), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,मंत्रालय,मुंबई.
१४. प्रधान सचिव, (उद्योग), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय,मुंबई.
१५. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला.
१६. संचालक, विमानचालन संचालनालय, मुंबई.
१७. उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्या, मुंबई
१८.विभागीय कार्यकारी अधिकारी, भारतीय विमानपत्तन प्राधिकरण (प.क्षे.), मुंबई.
१९.महालेखापाल, ( लेखा परीक्षा/ लेखा अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२०.उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग (अर्थसंकल्प), मंत्रालय,मुंबई.
२१.उप संचालक, विमानचालन संचालनालय, जूहू विमानतळ, मुंबई.
२२.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
२३.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
२४. निवड नस्ती.